१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, शुक्रवार २२ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३५, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 335, Marathi - Daily - Pune, 22 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## यूपीआयवर पैसे मागवणे १ ऑक्टोबरपासून बंद



**नवी दिल्ली-** यूपीआयद्वारे डिजिटल देवाणघेवाण करणाऱ्यांसाठी १ ऑक्टोबरपासून पैसे मागवण्याचे कलेक्ट रिक्वेस्ट फीचर कायमचे बंद होणार आहे. यूपीआयद्वारे होणाऱ्या फसवणुकीला आळा घालणे आणि व्यवहार सुरक्षितता वाढवणे यासाठी नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भीम, फोनपे, गुगल पे आणि पेटीएम यासारख्या सर्वच यूपीआय ॲप्सवर १ ऑक्टोबरनंतर दोन व्यक्तींमध्ये कलेक्ट रिक्वेस्ट व्यवहार करता येणार नाहीत. 'कलेक्ट रिक्वेस्ट' किंवा 'पुल ट्रान्झॅक्शन' हे फीचर वापरकर्त्यांना युपीआय द्वारे दुसऱ्या व्यक्तीकडून पैसे मागण्याची सुविधा देते. मात्र, वापरकर्त्यांच्या सोयीपेक्षा या फीचरमुळे स्कॅमर्सचीच सोय झाली.

# फडणवीस-राज ठाकरे ५० मिनिटे चर्चा
## मात्र वाहतूक बेशिस्त-खोळंबा हाच विषय

■ मुंबई



**ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याची चर्चा सुरू असतानाच मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आज सकाळीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. दोन्ही नेत्यांत तब्बल ५० मिनिटे चर्चा झाली. यावेळी मनसे नेते बाळा नांदगावकर आणि नितीन सरदेसाई सोबत होते. दोघांची दुसऱ्यांदा भेट झाल्याने चर्चांना उधाण आलेले असतानाच राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन मुंबईतील वाहतूक बेशिस्त व वाहतूक कोंडी यावर मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्याचे सांगितले.**

**मुंबईच्या** बिघडलेल्या वाहतूक व्यवस्थेवर उपायांचा आराखडा मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्याचे राज यांनी सांगितले. पण या भेटीने राजकीय वर्तुळात मात्र चर्चांना उधाण आले.

मुंबईच्या शहर वाहतूक नियोजनासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीसांशी गेल्या काही महिन्यांपासून आपली चर्चा सुरू होती. त्याच अनुषंगाने आजची ही भेट असल्याचे राज म्हणाले. आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेत राज यांनी भेटीचा वृत्तांत दिला. कबुतरे, कुत्रा, हत्तीसारख्या विषयात गुरफटल्याने शहर नियोजनासारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. पत्रकार परिषद सुरू असतानाच त्यांचा पाळीव कुत्रा राज यांच्याजवळ येऊन बसला. बेस्ट पतपेढीतील निवडणुकीबाबत मला काहीच माहिती नव्हते, ती स्थानिक निवडणूक होती असे म्हणत त्या निवडणुकीत ठाकरे ब्रँडचा पराभव झाल्याच्या चर्चेला महत्त्वच दिले नाही.

राज ठाकरे वाहतूक व्यवस्थेवरच प्रामुख्याने बोलत होते. ते म्हणाले, शहर नियोजन न केल्यास शहरे उद्ध्वस्त होतील. मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणात पुनर्विकास प्रकल्पांचे काम सुरू आहे. जिथे ५० माणसे राहत होती, आता तिथे ५०० माणसे आली आहेत. त्यांच्या गाड्या वाढल्या. कचरा वाढला. हे सर्व आता रस्त्यावर येत असून त्यामुळे शहराचा बट्ट्याबोळ होत आहे.यातून मार्ग काढण्याऐवजी नको तिथे भीती दाखवली » पान ७ वर

### कबुतरांवरून जैनांना टोला

राज ठाकरे यांनी कबुतरखाना वादावरही भाष्य केले. ते म्हणाले, घरात चार उंदीर झाले, तर आपण काय करतो? गणपतीचे वाहन आहे म्हणून घरात उंदीर ठेवतो का? मग असे कोण जैन लोक आहेत, जे कबुतरावर बसून फिरायला जातात. माणसे मेलेली चालतात, कबुतरे मेली नाही पाहिजेत. आज रेल्वेखाली, खड्ड्यात माणसे जातात. माणसांपेक्षा कबुतरे महत्त्वाची आहेत का, असा सवालही ठाकरेंनी विचारला.

# जीएसटी आता फक्त ५ व १८ टक्के
## प्रस्ताव मंजूर! दिवाळीत लागू होणार

■ नवी दिल्ली

**वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दर अधिक व्यवहार्य करण्याच्या केंद्र सरकारच्या बहुचर्चित प्रस्तावाला जीएसटी मंत्रिगटाने आज मंजुरी दिली. यात जीएसटीचे १२ आणि २८ टक्के हे दोन टप्पे रद्द केले आहेत. ५ आणि १८ टक्के असे दोनच टप्पे यापुढे राहणार आहेत. आता हे जीएसटी परिषदेपुढे मांडण्यात येईल व त्यांच्या मंजुरीनंतर दिवाळीत हा बदल अंमलात येईल. काँग्रेससह विरोधी पक्षांनी जीएसटी टप्पे कमी करा, कररचना सुलभ, सुटसुटीत करा अशी वेळोवेळी मागणी केली होती. व्यापारी आणि उद्योग जगताचाही यासाठी दबाव वाढल्याने मोदी सरकारला ही माघार घ्यावी लागली आहे.**

**देशभरात** एकसमान कर असावा या उद्देशाने लागू करण्यात आलेल्या जीएसटीमध्ये प्रत्यक्षात चार टप्पे असल्याने करआकारणी जटील बनली होती. त्यामुळे जीएसटीला देशभरातून विरोध होऊ लागला. जीएसटीचे करटप्पे कमी करण्याची मागणी होऊ लागली. प्रदीर्घ काळ ही मागणी होत राहिल्यानंतर आता अखेर तिची दखल घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करताना जीएसटीमध्ये सुधारणा करण्याची घोषणा केली होती. येत्या दिवाळीत जीएसटीचे नवीन टप्पे जाहीर केले जातील, असेही त्यांनी म्हटले होते. त्यानुसार जीएसटी मंत्रिगटाने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. त्यानंतर एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर बिहारचे उपमुख्यमंत्री आणि जीएसटी मंत्रिगटाचे प्रमुख सम्राट चौधरी म्हणाले की, जीएसटी कररचनेतून आता १२ टक्के आणि २८ टक्के हे दोन टप्पे हद्दपार करण्यात आले आहेत. मात्र, चैनीच्या वस्तुंवर ४० टक्के कर वसूल करणे सुरूच राहणार आहे.

अप्रत्यक्ष कररचनेला आणखी सुलभ करण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणून याकडे बघितले जात आहे. प्रस्तावित आराखड्यानुसार, जीवनावश्यक वस्तूंवर आता ५ टक्के जीएसटी आकारला जाईल आणि चैनीच्या वस्तू वगळता इतर वस्तूंवर १८ टक्के कर लावण्यात येईल. कॉफी, साखर, फास्ट फूड, शीतपेय, तंबाखू, सिगारेट, पान मसाला यासारख्या चैनीच्या वस्तूंवरील ४० टक्के कर कायम राहणार आहे. एवढेच नाही, तर लक्झरी कारचाही ४० टक्क्यांच्या टप्प्यामध्येच समावेश करण्याची शिफारसही करण्यात आली. या सुधारणेनंतरही पेट्रोल, डिझेल, मद्य हे जीएसटीच्या कक्षेत आणलेले नाहीत .

या नवीन बदलानुसार, सध्या १२ टक्क्यांच्या टप्प्यातील ९९ टक्के वस्तू ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये समाविष्ट होतील. त्यामध्ये औषधे, कपडे, चपला, दैनंदिन वापराच्या वस्तू यांचा समावेश असेल. २८ टक्क्यांच्या स्लॅबमधील ९० टक्के वस्तू १८ टक्क्यावर येतील. त्यामध्ये मुख्यत्वे घरगुती उपयोगाची उत्पादने, एसी, टीव्ही, छोट्या गाड्या यांचा समावेश असेल.

दरम्यान, काही राज्यांनी या सुधारणांमुळे आपल्या महसुलात लक्षणीय घट होईल अशी चिंता व्यक्त केली. जीएसटी मंत्रिगटाचे सदस्य असलेल्या पश्चिम बंगालच्या मंत्री चंद्रिमा भट्टाचार्य म्हणाल्या की, अनेक राज्यांना या सुधारणांमुळे आपल्या महसुलात लक्षणीय घट होण्याचा धोका वाटत आहे. सुधारणा अंमलात आल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांना नुकसानभरपाई दिली पाहिजे.

# जरांगे अधिक ताकदीने मुंबईला येणार
## जिल्हा बैठका-चावडी बैठकांना प्रतिसाद

■ मुंबई



**मराठा** आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील हे यावेळी मुंबईत अधिक ताकदीने येणार आहेत. ऐन गणेशोत्सवात २८ ऑगस्टला मुंबईच्या आझाद मैदानात लाखो मराठा आंदोलन करणार आहे. मुख्य आंदोलन आझाद मैदान येथे होणार असून, मराठा आंदोलकांसाठी बीकेसीतील मैदानही ठेवावे अशी विनंती राज्य सरकार व मुंबई पालिकेने केली आहे. तरीही जरांगे-पाटील व आंदोलकांना मुंबईपर्यंत येऊ न देता ठाण्याच्या बाहेरच अडविण्याची रणनीती आखली जात आहे.

मनोज जरांगे-पाटील हे गणेशचतुर्थीला म्हणजे गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी २७ ऑगस्टला सकाळी अंतरवाली सराटी येथून निघतील आणि त्या दिवशी जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्यावर जाऊन दर्शन घेऊन मुक्काम करतील. २८ ऑगस्टला मराठा मोर्चा राजगुरुनगर, चाकण, तळेगाव, लोणावळा, पनवेल, वाशी, चेंबूर मार्गे मुंबईला पोहोचेल. या मोर्चात महिला आणि तरुणांचा मोठा सहभाग असेल.

मराठा मोर्चाची तयारी जोरात सुरू » पान ७ वर

## शिखर बँक घोटाळा प्रकरण
## रोहित पवार यांना जामीन

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य सहकारी बँक (शिखर बँक) आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांना आज पीएमएलए विशेष न्यायालयाने दिलासा दिला. याप्रकरणी आज पार पडलेल्या सुनावणीत न्यायालयाने त्यांना जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. त्यानंतर राजकीय दबावातून आपल्यावर कारवाई सुरू असल्याचा आरोप आ. रोहित पवार यांनी केला.

आमदार रोहित पवार म्हणाले की, मी सरकारविरोधात बोलतो म्हणून कारवाई केली जात आहे. एफआयआरमध्ये अजित पवार, हसन मुश्रीफ यांच्यासह ७५ नेत्यांची नावे आहेत. मात्र ते इतके निवांत कसे आहेत? अजित पवारांची फाईल कपाटात ठेवून माझी बाहेर काढली आहे. एफआयआरमध्ये माझे नाव नाही. तरीही माझ्यावर कारवाई होत आहे. न्यायालयाचा सन्मान ठेवत मी सुनावणीसाठी हजर झालो. मी कारखाना घेतला तेव्हा त्यावर प्रशासक होते. » पान ७ वर

# उपराष्ट्रपतीपद निवडणुकीसाठी
## मुख्यमंत्र्यांचा पवार-ठाकरेंना फोन

■ मुंबई

**उपराष्ट्रपतीपदाच्या** निवडणुकीत महाराष्ट्रातून कोणताही दगाफटका होणार नाही, यासाठी भाजपाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खांद्यावर जबाबदारी टाकली आहे. याच अनुषंगाने फडणवीसांनी माजी कृषिमंत्री शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना फोन करत एनडीए उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन केले. विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयातील माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर झाल्यामुळे एनडीएचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे





राज्यपाल सी. व्ही. राधाकृष्णन यांच्यापुढे आव्हान निर्माण झाले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस हे महाविकास आघाडीच्या नेत्यांशी संवाद साधणार आहेत. याचाच भाग म्हणून फडणवीसांनी शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवरून संवाद साधत एनडीएला पाठिंबा देण्याची विनंती केली. याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्व खासदारांनी आपल्या महाराष्ट्रातील माणूस उपराष्ट्रपती होतो म्हणून त्यांना मतदान केले पाहिजे. इतर पक्षांनाही माझे हे आवाहन आहे. विशेषतः महाराष्ट्राची » पान ७ वर

# ऑनलाईन मनी गेमिंगवर बंदी
## संसदेत नवा कायदा मंजूर

■ नवी दिल्ली

**ऑनलाईन** गेमिंगच्या नावाखाली चाललेल्या जुगाराला आवर घालणारे विधेयक आज राज्यसभेतही मंजूर झाले. काल हे विधेयक लोकसभेत विरोधकांच्या गदारोळातच मंजूर करण्यात आले होते. आज राज्यसभेतही विधेयक मंजूर झाल्याने त्याचे कायद्यात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या विधेयकामध्ये ऑनलाईन मनी गेमिंग सेवेवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली. उल्लंघन करणाऱ्याला दंडाची तरतूद करण्यात आली आहे.



ऑनलाईन मनी गेमिंगची सेवा चालविणाऱ्यास तीन वर्षांपर्यंतचा तुरुंगवास किंवा १ कोटी रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. अशा सेवांची जाहिरात करणाऱ्यांना दोन वर्षांपर्यंतचा कारावास किंवा ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. तसेच या रिअल मनी गेमसाठी व्यवहार सुविधा देणाऱ्या बँका आणि वित्तीय संस्थांना तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा एक कोटी रुपयांचा दंड अशी तरतूद विधेयकात आहे. » पान ७ वर

# पावसाळी अधिवेशन संपले! २६ विधेयके चर्चेविना मंजूर

■ नवी दिल्ली

**संसदेच्या** पावसाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. २१ जुलै रोजी सुरू झालेल्या अधिवेशनात महिनाभरामध्ये लोकसभेत १२ आणि राज्यसभेत १४ विधेयके कोणत्याही चर्चेविना मंजूर झाली. ऑपरेशन सिंदूर वगळता कोणत्याही महत्त्वाच्या मुद्यावर अधिवेशनात चर्चा झाली नाही. सदस्यांचा गोंधळ, गदारोळ, सभात्याग यामुळे कामकाजात सातत्याने अडथळे आले. इंडिया आघाडीने बिहारमधील मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणीवर संसदेत चर्चा करण्याची मागणी लावून धरली.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहाचे कामकाज १२० तास चालवण्याचे नियोजन होते. मात्र केवळ ३७ तासच चालले. या अधिवेशनात ४१९ प्रश्न विचारण्यात आले. त्यापैकी ५५ प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.



शेवटी गदारोळातच सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले. राज्यसभेचे कामकाजही सकाळीच झालेल्या गदारोळानंतर ते दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा यांनी काल लोकसभेत तीन विधेयके सादर केली. यावेळी विरोधी पक्षांनी ही विधेयके लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप करत त्याच्या प्रती फाडून गृहमंत्र्यांच्या दिशेने फेकून दिल्या. ऑनलाईन मनी गेम्सवर बंदी आणणारे ऑनलाईन गेमिंग संवर्धन आणि नियमन विधेयक २०२५ लोकसभेत मंजूर करण्यात आले. तसेच राज्यसभेत गुवाहाटी येथे देशातली २२ वी भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) स्थापन करण्यासाठीचे विधेयक मंजूर करण्यात आले. पुढील वर्षाच्या सुरुवातीला » पान ७ वर

# भटक्या कुत्र्यांबाबत तातडीने
## सुनावणी घेण्यास कोर्टाचा नकार

■ नवी दिल्ली

**दिल्लीतील** सर्व भटक्या कुत्र्यांना पकडून आश्रय केंद्रांमध्ये डांबण्याच्या दिल्ली महापालिकेने दिलेल्या आदेशाच्या विरोधात दाखल याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला.

ॲड. ननिता शर्मा यांनी ही याचिका दाखल करून त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती. न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. विजय बिश्नोई यांच्या न्यायासनासमोर आज ही याचिका सुनावणीस आली असता न्यायालयाने त्यावर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. ८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने भटक्या कुत्र्यांबाबत कठोर आदेश दिल्यापासून राजधानी दिल्लीत हा मुद्दा चर्चेत आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात अनेक याचिका दाखल होत आहेत. मात्र न्यायालय तूर्त आपल्या आदेशावर ठाम आहे.

## काश्मीर सरकारने २५ पुस्तकांवर बंदी घातली! लेखकांमध्ये संताप

■ श्रीनगर

जम्मू आणि काश्मीर सरकारने नुकतीच सरकारच्या कारभारावर टीका करणाऱ्या २५ पुस्तकांवर बंदी घातली. यामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे नातू सुमंत्र बोस यांच्या दोन पुस्तकांचा समावेश आहे. सरकारच्या या बंदी आदेशावर लेखकांनी संताप व्यक्त केला आहे. सरकार जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप या लेखकांनी केला आहे.

सुमंत्र बोस यांच्या बंदी घातलेल्या दोन पुस्तकांपैकी एक पुस्तक हे १८ वर्षांपूर्वी प्रकाशित झालेले आहे. बंदी घातलेल्या पुस्तकांमध्ये बुकर पुरस्कार विजेत्या लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'आझादी' या पुस्तकाचा समावेश आहे. सरकारचा असा युक्तिवाद आहे की, ही पुस्तके दहशतवाद आणि फुटीरतावादाला प्रोत्साहन देणारी आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेला ती धोका निर्माण करू शकतात.

# उत्तर व पश्चिम भारतात पावसाचा कहर
## रुद्रप्रयागमध्ये भूस्खलन! बद्रीनाथ-गंगोत्री मार्ग बंद

■ नवी दिल्ली



**महाराष्ट्रात** गेले काही दिवस धुमाकूळ घालणाऱ्या पावसाने आता उत्तर व पश्चिम भारतात जोर धरला असून, मुसळधार पावसामुळे अनेक राज्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, गुजरात आणि उत्तर प्रदेश या राज्यांत पूर, भूस्खलन होऊन वाहतूक ठप्प झाली आहे. रुद्रप्रयागमध्येही भूस्खलन झाल्याने बद्रीनाथ-गंगोत्री महामार्ग बंद झाला आहे. हवामान खात्याने काही भागांमध्ये रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील भूस्खलनामुळे बद्रीनाथ महामार्ग धारासू पुराण ठाणे आणि सोनगढजवळ बंद झाला आहे. यमुनोत्री महामार्ग नारदचट्टीजवळ बंद असून, ढिगारे हटवले जात आहेत. काही मार्गांवर वाहतूक पूर्ववत झाली असली तरी धोका अजूनही टळलेला नाही. हिमाचल प्रदेशात २० जूनपासून पावसाशी संबंधित अपघातांमध्ये आतापर्यंत १४५ लोकांचा मृत्यू झाला आहे. भूस्खलन, पूर आणि रस्ते अपघातांमुळे राज्यात एकूण २,२८१ कोटी रुपयांचे नुकसान झाले. अनेक भागांत वीज व पाणीपुरवठा खंडित झाला. उत्तर प्रदेशात यमुना नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने आग्र्यात नदीचे पाणी ताजमहालपर्यंत पोहोचले आहे.

## एस. जयशंकर यांची मॉस्कोत
## रशियन परराष्ट्रमंत्र्यांशी भेट

■ मॉस्को

**रशियाकडून** तेल खरेदी केल्यामुळे अमेरिकेने भारतावर करापोटी अतिरिक्त २५ टक्के दंड आकारण्याची घोषणा केली. त्याचवेळी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी आज रशियाची राजधानी मॉस्को येथे रशियन परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव्ह यांची भेट घेतली. दोन्ही देशांतले संबंध दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर सर्वाधिक स्थिर आणि विश्वासार्ह राहिलेले आहेत, असे जयशंकर म्हणाले.

या भेटीनंतर ते म्हणाले, ही भागीदारी केवळ राजकारणापुरती मर्यादित नाही, तर यामध्ये संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक आणि लोकांमधील परस्पर संबंध यांचाही समावेश आहे. गेल्या काही वर्षांत दोन्ही देशांमध्ये अनेक उच्चस्तरीय गाठीभेटी झाल्या. यामध्ये गेल्यावर्षीची २२वी वार्षिक शिखर परिषद आणि कजान येथील बैठकीचाही समावेश आहे. या बैठकांमुळे द्विपक्षीय संबंधांना नवी दिशा देण्याचे काम झाले. » पान ७ वर

ऐकु कमी येणाऱ्यांसाठी



सवलतीच्या दरात कानाचे मशिन उपलब्ध

रु. २५००

आणि

रु. ३५००

कानाच्या आतील न दिसणारे लहान मशिन ४५००/-

घरपोच उपलब्ध दिल्या जातील.

साई हेल्थ केअर डिलिव्हरी चार्ज १०० रु.

7021300945

9820351923

# बिहारमध्ये वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी अखेर जाहीर

■ नवी दिल्ली

**न्यायालयांच्या आदेशानंतर आयोगाची कार्यवाही**

**निवडणूक** आयोगाने एसआयआर मसुदा मतदार यादीतून बिहारमधील ज्या ६५ लाख मतदारांची नावे वगळली होती त्यांची यादी जाहीर केली आहे. ही यादी जनतेसाठी आयोगाच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या १४ ऑगस्ट रोजीच्या आदेशानंतर निवडणूक आयोगाने ही यादी प्रसिद्ध केली आहे. बिहारमध्ये विशेष सुधारणानंतर निवडणूक आयोगाने प्रकाशित केलेल्या मसुदा यादीतून ज्या मतदारांची नावे वगळण्यात आली होती त्यांची नावे या यादीत समाविष्ट आहेत. मतदारांना त्यांची नावे सहज तपासता यावीत यासाठी निवडणूक आयोगाच्या बिहार वेबसाईटवर एक नवीन लिंक देखील सक्रिय केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला सर्व वगळलेल्या मतदारांची जिल्हावार यादी प्रकाशित करण्याचे आणि मृत्यू, स्थलांतर किंवा दुहेरी नोंदणीमुळे त्यांना वगळण्याची कारणे सांगण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार निवडणूक आयोग सर्व मतदान केंद्रांवर 'एएसडी' म्हणजेच अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत मतदारांची नावे प्रकाशित करत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ते ऑनलाईन करण्याची शक्यता आहे.बिहारच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार रोहतास, बेगुसराई, अर्ध्वल, सिवान, भोजपूर व अन्य निवडणूक केंद्रांवर 'एएसडी' यादी लावली जाणार आहे.

**देश विदेश**

# मलेशियात शुक्रवारची नमाज चुकवणाऱ्यांना तुरुंगवासाची शिक्षा

■ क्वालालंपूर

**मलेशियातील** तेरेंगानू राज्याने वैध कारणाशिवाय शुक्रवारची नमाज चुकवणाऱ्या मुस्लीम पुरुषांवर कठोर कायदा लागू केला आहे. नव्या नियमांनुसार अशा व्यक्तींना दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास, ३,००० रिंगिट (सुमारे ६०,००० रुपये) दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. याआधी सलग तीन वेळा नमाज चुकवल्यास सहा महिन्यांचा तुरुंगवास वा १,००० रिंगिट दंड अशी शिक्षा होती. मात्र, आता कायदा आणखी कडक करण्यात आला असून, मशिदींमध्ये याबाबतचे फलक लावले जाणार आहेत. कारवाईसाठी धार्मिक गस्त पथके आणि नागरिकांच्या तक्रारींवर भर दिला जाणार आहे. मानवाधिकार संघटनांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एशिया ह्यूमन राईट्स अँड लेबर अॅडव्होकेट्सचे संचालक फिल रॉबर्टसन यांनी सांगितले की, धर्मस्वातंत्र्य म्हणजे सामील होण्याचा किंवा न होण्याचा अधिकार आहे.

# अमेरिकेकडून ६ हजार विद्यार्थ्यांचा व्हिसा रद्द

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** ६,००० हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले आहेत. यामध्ये सुमारे ४,००० विद्यार्थी हल्ला, चोरी, मद्यधुंद अवस्थेत वाहनचालक अशा गुन्ह्यांमध्ये सामील असल्याचे समोर आले. तर २०० ते ३०० प्रकरणे दहशतवादाशी संबंधित आहेत.

अमेरिकन अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनांमुळे कायद्यांचे उल्लंघन होऊन कॅम्पस व जनतेच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला. २०२३-२४ मध्ये अमेरिकेत ११ लाखांहून अधिक परदेशी विद्यार्थी शिकत होते. दरम्यान, अमेरिकेने २ सप्टेंबरपासून व्हिसा ड्रॉप बॉक्स सुविधा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अकाली नेते जर्नेलसिंग यांच्या निवासस्थानी ईडीची धाड

■ चंदिगड

**शिरोमणी** अकाली दलाचे ज्येष्ठ नेते जर्नेलसिंग वाहीद यांच्या पंजाबच्या फगवाडा शहरातील निवासस्थानी अंमलबजावणी संचलनालयाच्या (ईडी) पथकाने धाड टाकून कागदपत्रांची छाननी केली. दोन वर्षांपूर्वी सरकारी मालकीचा साखर कारखाना विकण्यात कथित गैरव्यवहार झाला होता. या प्रकरणी ईडीने ही छापेमारी केली, असे सांगण्यात आले. आर्थिक दक्षता विभागाने साखर कारखाना विक्री प्रकरणात जर्नेलसिंग आणि त्यांच्या कुटुंबियांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्या अनुषंगाने ईडीने गेल्या सप्टेंबर महिन्यात जर्नेलसिंग, त्यांच्या पत्नी रुपिंदर कौर, मुलगा संदीप सिंग आणि अन्य नऊ जणांविरोधात मनी लॉंडरिंगचा गुन्हा दाखल केला होता. पंजाब सरकारने १९३३ साली जगतजीतसिंग सहकारी साखर कारखान्याला ३१ एकर जमीन ९९ वर्षांसाठी काही अटींवर भाडेतत्वावर दिली होती.त्या अटींचा भंग करून हा कारखाना विकण्यात आला,असा आरोप आहे.

# जलालाबाद आता 'परशुरामपुरी' प्रस्तावाला केंद्र सरकारची मंजुरी

■ लखनौ

**उत्तर प्रदेश** सरकारने जलालाबाद हे नाव बदलून परशुरामपुरी केले जावे, असा प्रस्ताव उत्तर प्रदेश सरकारने केंद्राला पाठवला होता. या नामांतराला केंद्र सरकारने मंजुरी दिली. परशुरामपुरी हे नाव असण्याला आमचा आक्षेप नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले.

जलालाबाद हे ठिकाण भगवान परशुराम यांचे जन्मस्थळ आहे. या ठिकाणी भगवान परशुराम यांचे पुरातन ऐतिहासिक मंदिरही आहे. त्यामुळे जलालाबादचे नाव परशुरामपुरी करण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत होती. २०१८ आणि २०२३ या दोन वर्षांमध्ये यासंदर्भातले प्रस्ताव नगर परिषदेतही मंजूर झाले होते. आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पाठवलेल्या प्रस्तावानंतर या नावाला केंद्रानेही मंजुरी दिली आहे.

# चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेचा नौदल ड्रोन ताफा

■ न्यूयॉर्क



**चीनच्या** वाढत्या नौदल शक्तीला टक्कर देण्यासाठी अमेरिका मोठ्या प्रमाणावर ड्रोन नौदल ताफा उभारण्याच्या तयारीत आहे.

यूक्रेन-रशिया युद्धात ड्रोन बोटींचा प्रभाव पाहता, अमेरिका अशा तंत्रज्ञानाचा वापर तैवान सामुद्रधुनीत चीनच्या हालचाली रोखण्यासाठी करू इच्छित आहे. या ड्रोन बोटी शस्त्र, स्फोटके आणि गुप्तचर उपकरणे वाहून नेण्यास सक्षम असून, त्यांचा वापर कमिकाझे मिशनसाठी केला जाऊ शकतो. मात्र हा ड्रोन ताफा गुंतागुंतीचा आणि महागडाही आहे.

शिवाय अलीकडे ड्रोन चाचण्यांमध्ये काही गंभीर अपघात घडल्याने या प्रकल्पावर तांत्रिक मर्यादा आल्या आहेत. गेल्या महिन्यात कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावरील चाचणीदरम्यान दोन ड्रोन बोटींमध्ये जोरदार धडक झाली होती. एका बोटीत सॉफ्टवेअर बिघाड झाल्यामुळे ती थांबली असताना, दुसरी बोट तिच्यावर आदळून डेकवरून उडत पाण्यात कोसळली होती. आणखी एका वेगळ्या चाचणीत, एक वेगाने चालणारी बोट अचानक उलटून तिचा कप्तान पाण्यात फेकला गेला होता. या दोन्ही घटनांमागे सॉफ्टवेअर चुकांबरोबरच मानवी चुकाही कारणीभूत ठरल्याची माहिती आहे.

# महापे एमआयडीसीमधील झोपड्या ४ आठवड्यांत हटवा

■ मुंबई



**उच्च न्यायालयाचे आदेश**

**महापे** एमआयडीसीमध्ये बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या झोपड्या चार महिन्यांत हटवा, असे निर्देश उच्च न्यायालयाने नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. औद्योगिक क्षेत्रातून होणाऱ्या हानिकारक उत्सर्जनाचा संबंधित झोपड्यांना धोका आहे. या वस्तुस्थितीची गंभीर दखल घेत न्यायालयाने बेकायदा झोपड्यांचे पाडकाम करण्यासाठी पालिकेला चार आठवड्यांची डेडलाईन दिली.

धोकादायक औद्योगिक क्षेत्रात बेकायदेशीरपणे झोपड्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. याचा संबंधित झोपड्यांतील रहिवाशांच्या जीविताला धोका असल्याचा दावा करीत सामाजिक कार्यकर्ते मंगेश म्हात्रे यांनी याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्या म्हात्रे यांनी बेकायदा झोपड्यांचे पाडकाम करण्यासाठी नवी मुंबई महापालिकेला निर्देश देण्याची विनंती केली. ठाणे ट्रान्स क्रीक परिसरातील श्रमिक वस्ती झोपडपट्ट्यांमधील १६८ झोपड्या वाल्मिकी निवास झोपडपट्ट्यांखाली पुनर्वसन केलेल्या लोकांनी व्यापल्या आहेत, असा आरोपदेखील म्हात्रे यांनी केला होता.

# पालघर जिल्ह्यात अतिवृष्टीतही शिक्षकांना हजर राहण्याचे आदेश

■ पालघर

**शिक्षक संघटना संतप्त**

**गेल्या** काही दिवसांपासून पालघरमध्ये मुसळधार पाऊस कोसळत आहे. अशा अतिवृष्टीच्या जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली जात आहे. परंतु जरी शाळा बंद असल्या तरी शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची शाळेतील उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. तसे आदेशच शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र या निर्णयामुळे शिक्षक संघटनांमध्ये संताप व्यक्त होत आहे. गेल्या दोन वर्षांपासून केवळ पालघर जिल्ह्यातच ही सक्ती केली जात आहे. राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्यात अशी अट नाही, असा आरोप महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ-फेडरेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कानडे यांनी केला आहे.

# पुण्यात गणेशोत्सवामध्ये ७ दिवस १२ वाजेपर्यंत स्पीकर अनुमती

■ पुणे

**राज्य सरकारने** यंदाचा गणेशोत्सव सण राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात यंदा गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत स्पीकर वाजविण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री आशिष शेलार बोलत होते. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री शेलार म्हणाले की, यंदाच्या गणेशोत्सवात ७ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत जिल्हाधिकाऱ्यांना परवानगी देण्यात आली.

# बोरघाटात अवजड वाहनांना पूर्णतः बंदी

■ अलिबाग

**मुंबई-पुणे** राष्ट्रीय महामार्गावरील बोरघाटात वारंवार होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून या महामार्गावर सर्व प्रकारच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीस पूर्णतः बंदी घातली आहे. ही वाहतूक अधिसूचना तत्काळ प्रभावाने लागू केली असून, पुढील आदेश येईपर्यंत ती कायम राहणार आहे.

बोरघाट हा तीव्र चढ-उतार आणि वळणांचा धोकादायक रस्ता असल्याने यापूर्वीही अनेक अपघात घडले आहेत. काही दिवसांपूर्वी एका कंटेनरने २१ गाड्यांना धडक दिली होती. यात एका महिलेचा मृत्यू झाला होता. अशा अपघातांच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. या बंदीमुळे रायगड जिल्हा हद्दीतून जड-अवजड वाहनांची वाहतूक थांबवली जाईल. सामान्य वाहनधारकांसाठी मात्र वाहतूक पूर्ववत सुरू राहणार आहे.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर उद्यापासून अवजड वाहनांना बंदी

**२८ ऑक्टोबरपर्यंत मनाई रहाणार**

■ मुंबई

**गणेशोत्सवासाठी** गणेशमुर्तीचे आगमन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गावर शनिवार २३ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट दरम्यान अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना हा बंदी आदेश लागू असेल.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर २३ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२ वाजल्यापासून २८ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत जड वाहनांना वाहतूक बंदी असणार आहे. यामध्ये अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी आदी वाहनांचा समावेश आहे. तसेच ५ व ७ दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन आणि परतीच्या प्रवासासाठी ३१ ऑगस्ट आणि २ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी ११ दिवसांचे गणपती विसर्जन, परतीच्या प्रवासाकरिता ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ते ७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहतूकीस बंदी राहील.

हे निर्बंध जेएनपीटी बंदर ते जयगड बंदर येथून आयात-निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर, औषधे, लिक्वीड मेडीकल ऑक्सिजन, अन्नधान्य, भाजीपाला व नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाहीत.

# दिशाभूल जाहिरात! रॅपिडोला दंड

■ नवी दिल्ली




**बाईक** टॅक्सी सेवा पुरवणाऱ्या राईड-हेलिंग कंपनीला (रॅपिडो) केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (सीसीपीए) १० लाख रुपयांचा दंड ठोठावला. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्याबाबत ही कारवाई करण्यात आली. याशिवाय ग्राहकांना पैसे परत करण्याचे आणि संबंधित जाहिरात तत्काळ काढून टाकण्याचे आदेश कंपनीला देण्यात आले. कारवाई झालेल्या जाहिरातीत रॅपिडोने दावा केला होता की, त्यांची कंपनी ५ मिनिटांत सेवा पुरवेल अथवा ग्राहकांना ५० रुपये कॅशबॅक देईल. त्याचबरोबर इतर काही सेवांचीही आश्वासने देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. गेल्या दोन वर्षांत, सुमारे १८०० वापरकर्त्यांनी रॅपिडोने त्यांचे आश्वासन पूर्ण न केल्याच्या तक्रारी दाखल केल्या. रॅपिडोने देशभरातील १२० शहरांमध्ये ५४८ दिवस वेगवेगळ्या भाषांमध्ये अशा जाहिराती चालवल्या. रॅपिडोने या जाहिराती जाणीवपूर्वक चालवल्याचे सीसीपीएला तपासात आढळले. त्यांनी दिलेला ५० रुपयांचा कॅशबॅक रोख स्वरूपात देण्यात आला नाही. त्याऐवजी कंपनीने 'रॅपिडो कॉइन्स' दिले, ही नाणी फक्त बाईक राईडसाठीच वापरावी लागतात.

# दिल्लीतील नामांकित शाळांना तिसऱ्यांदा बॉम्बची धमकी

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्लीतील शाळांना आठवड्याभरात तिसऱ्यांदा बॉम्ब धमकी मिळाल्याने शाळा प्रशासन आणि विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये खळबळ उडाली आहे. आतापर्यंत ८० शाळांना धमकी मिळाल्यामुळे दिल्ली पोलीस तपास करत आहेत.

आज दिल्लीतील पाच शाळांना बॉम्ब धमक्या मिळाल्या. त्यात प्रसाद नगर आणि द्वारका सेक्टर ५ यांचा समावेश आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, घटनास्थळी तपास सुरू आहे. ही या आठवड्यातील तिसरी धमकीची घटना आहे. काल दिल्लीतील ५० हून अधिक शाळांना बॉम्ब धमकीचे ईमेल प्राप्त झाले होते. पोलिसांच्या माहितीनुसार, या शाळांमध्ये एसकेव्ही हौज राणी, मालवीय नगर येथील शाळा आणि आंध्र स्कूल, करोल बाग यांचा समावेश होता. धमकी मिळालेल्या शाळांमध्ये बहुतेक शाळा द्वारका येथील दिल्ली पब्लिक स्कूल, बीजीएस इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, श्री व्हेन्कटेश्वर स्कूल आणि ग्लोबल स्कूल यांचा समावेश होता. डीपीएस शाळेने विद्यार्थ्यांना घरी पाठवले आणि त्या दिवशी शाळा बंद ठेवण्याची घोषणा केली.पोलिसांनी बॉम्ब डिस्पोजल स्क्वॉड आणि श्वान पथकासह अनेक पथकांची नियुक्ती केली. प्रत्येक शाळेची तपासणी केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, शोध ऑपरेशन पूर्ण झाले आहे आणि काही संशयास्पद आढळलेले नाही. सायबर फॉरेन्सिक तज्ज्ञ आता ईमेल्स पाठवणाऱ्याचा आयपी पत्ता ट्रेस करत आहेत. धमक्यांमुळे दिल्ली पोलिसांकडून तपासणी सुरू आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये दिल्ली-एनसीआरमधील अनेक शाळा आणि महाविद्यालयांना अशा प्रकारच्या धमक्या प्राप्त झाल्या आहेत.

# ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी ६ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती

■ मुंबई

**राज्यातील** ब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या परशुराम आर्थिक विकास महामंडळावर सहा वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजगोपाल देवरा, मनीष वर्मा, विजय सौरभ, विकास चंद्र दस्तोगी, बी. अंबलगन आणि अप्पासो धुळार यांची संचालकपदी नियुक्ती केली आहे. महामंडळावरील राजकीय नियुक्त्यांवर वाद सुरू असताना, मुख्यमंत्र्यांनी शासकीय नियुक्त्यांचा मार्ग मोकळा केला आहे. सारथीच्या धर्तीवर हे महामंडळ व्यवसाय व शिक्षणासाठी कर्जपुरवठा करते. सध्या महामंडळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेले असून, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक काशिष दामले हे अध्यक्षपदी कार्यरत आहेत. या महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ब्राह्मण तरुणांना व्यवसाय, लघुउद्योग, वाहतूक, शेतीपूरक उपक्रम तसेच शिक्षणासाठी कर्ज, व्याजपरतावा आणि निवास-भोजन भत्ता मिळणार आहे. व्यवसायासाठी १५ लाखांच्या कर्जावर व समूह कर्जासाठी ५० लाखांपर्यंत व्याज परतावा, तर शिक्षणासाठी १० लाखांचे कर्ज उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध समाजघटकांना खूश ठेवण्याच्या प्रयत्नांचा हा भाग असल्याची चर्चा सुरू आहे.

# आता लोकसभेचे कामकाज कोकणी भाषेतही ऐकता येणार

■ पणजी

**भारतीय** संसदेच्या इतिहासात पहिल्यांदाच आता लोकसभेचे संपूर्ण कामकाज कोकणी भाषेत थेट ऐकण्याची सोय उपलब्ध झाली आहे. यासाठी इव्हिटा डिसोझा, गौरी मावलिणकर आणि समीक्षा वेळीप यांची कोकणी दुभाषी म्हणून लोकसभा सचिवालयात नियुक्ती करण्यात आली आहे. या ऐतिहासिक क्षणाच्या निमित्ताने गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी नवी दिल्लीत या तिन्ही दुभाषींची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. शरत कृष्णा रायकर यांच्या मार्गदर्शनाखाली या तिन्ही दुभाषींना प्रशिक्षण दिले असून, गेल्या सोमवारपासून लोकसभेचे कामकाज पूर्णपणे कोकणी भाषेत थेट प्रसारित होण्यास सुरुवात झाली आहे. लोकसभेच्या सत्राच्या सुरुवातीलाच अध्यक्ष ओम बिर्ला यांनी कोकणी भाषेचा थेट भाषांतर प्रणालीत समावेश केल्याची घोषणा केली. संपूर्ण जगात भारताची संसद ही एक अशी संसद आहे की, जिथे २२ भाषांमध्ये थेट भाषांतर उपलब्ध आहे.

# रशियाने युक्रेनवर चढवला यंदाचा तिसरा मोठा हल्ला

■ कीव्ह

**रशिया-युक्रेन** युद्ध संपवण्यासाठी जगभरातली नेतेमंडळी प्रयत्न करत आहेत. त्याचवेळी रशियाने युक्रेनवर यंदा सर्वांत मोठा तिसरा हल्ला केला आहे. रशियाच्या या हल्ल्यात युक्रेनच्या पश्चिमेकडील एका प्रमुख अमेरिकी इलेक्ट्रॉनिक्स मॅन्यूफॅक्चर कंपनीला लक्ष्य करण्यात आले. अधिकाऱ्यांच्या मते, या हल्ल्यात कमीत कमी एकाचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले.

युक्रेनच्या हवाईदलाने आज दावा केला, की रशियाने यंदा युक्रेनवर सर्वांत मोठा हवाई हल्ला केला. यामध्ये ५७४ ड्रोन आणि ४० क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला. युक्रेनच्या पश्चिम भागाला लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यानंतर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्सकी म्हणाले, की युद्ध समाप्त करण्यासाठी रशियाकडून कोणतेही संकेत मिळत नाहीत. युद्ध समाप्तीसाठी चर्चा सुरू असल्याचेही वाटत नाही. अमेरिकी कंपनीवर झालेल्या या हल्ल्यात १५ जण जखमी झाले. स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया, तुर्की यासारख्या युरोपातील तटस्थ देशात पुतिन यांच्यासोबत युद्ध समाप्तीसाठी चर्चा करण्यात तयार असल्याचेही झेलेन्सकी यांनी सांगितले.

# केरळमधील शाळेच्या गेटजवळ स्फोटकाचा स्फोट! महिलेला दुखापत

■ तिरुवनंतपूरम

**केरळमधील** पलक्कड येथील वडकंथरा येथील एका शाळेच्या गेटजवळ स्फोट झाल्याने एकच खळबळ उडाली. शाळेच्या गेटजवळ एका विद्यार्थ्याला ही स्फोटके दिसली. ही स्फोटके रानडुकरांना मारण्यासाठी वापरली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

वडकंथरा येथील व्यास विद्या पीडोम प्री-प्रायमरी स्कूलचा १० वर्षीय विद्यार्थी नारायणला काल दुपारी ३.४५ वाजताच्या सुमारास शाळेच्या गेटजवळ ही स्फोटके आढळली. नारायणने त्यातील एक जमिनीवर फेकल्यानंतर मोठा आवाज झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ माजली. या स्फोटात विद्यार्थी आणि जवळ उभ्या असलेल्या एका वृद्ध महिलेला किरकोळ दुखापत झाली. जखमींना ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. पोलिसांनी घटनास्थळाची तपासणी केली असता त्यांना एका बादलीत चार स्फोटके सापडली. पोलीस आता सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे स्फोटके ठेवणाऱ्याचा शोध घेत आहेत.

# गणेश आगमन सोहळ्यात ६४ मोबाईल लंपास

■ मुंबई



**मुंबईत** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्यावतीने आयोजित केलेल्या या आगमन सोहळ्यात ६४ मोबाईल आणि चार सोनसाखळ्या चोरीला गेल्या. काळाचौकी आणि लालबाग परिसरात गेल्या रविवारी तब्बल ३५ गणपतींच्या आगमन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. या सोहळ्यादरम्यान भोईवाडा आणि काळाचौकी पोलिसांच्या हद्दीत ही चोरी झाली.

चिंतामणीच्या आगमन सोहळ्याला प्रचंड गर्दी उसळली होती. याच गर्दीचा फायदा घेत चोरांनी हात साफ केला. ऐवज चोरीला गेल्याने नागरिकांनी थेट पोलीस ठाण्यांमध्ये धाव घेतली. त्यानंतर भोईवाडा आणि काळाचौकी पोलीस ठाण्यात मोबाईल चोरीचे तब्बल २० गुन्हे दाखल झाले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥


# ऑनलाईन जुगारात घबराट आणि कांगावा

गेल्याच आठवड्यात ऑनलाईन गेमिंगसंदर्भात धोक्याचा इशारा देणारा मजकूर आम्ही दिला होता. आध्यात्मिक क्षेत्रातले अध्वर्यू स्वामी सवितानंदांनी आवाहनवजा पत्र लिहून अनेक तरुणांचे जीवन उद्‌ध्वस्त करणारी उदाहरणे दिली होती. आणि आता याचसंदर्भात केंद्र सरकारने संसदेत विधेयक मांडून या ऑनलाईन जुगाराच्या मुसक्या आवळल्या आहेत. ज्याअर्थी केंद्र सरकारला इतक्या तातडीने या ऑनलाईन गेम विरोधात कडक पावले उचलण्याची वेळ आली त्याअर्थी या खेळातून ऑनलाईन जुगार खेळवणाऱ्या कंपन्या लोकांची केवळ लूट करीत होत्या. घरंदारं गहाण टाकून कर्जबाजारी होऊन या जुगाराच्या नादी लागण्याचे प्रकार प्रचंड प्रमाणात वाढले. त्यासंदर्भातल्या अक्षरशः हजारो तक्रारी देशाच्या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल होत होत्या. परंतु कायदाच नसल्याने ठोस कारवाई होत नव्हती. आता यासंदर्भातल्या कायद्याने बेकायदेशीर ऑनलाईन जुगार चालवणाऱ्यांवर तडाखा बसला आणि दीड हजारांपेक्षा जास्त मोबाईल ॲप्स ब्लॉक केले गेले. अतिशय कौशल्याने तंत्रज्ञानाचा अत्यंत सोयिस्कर वापर करण्याचे तंत्र या कंपन्यांनी विकसित केले. पत्त्यांबरोबरच इतरही अनेक गेममध्ये पैसे लाभण्याची सोय केली गेली आणि खेळणाऱ्याच्या खात्यातून परस्पर रक्कम वजाही होऊ लागली. भारतासारख्या तंत्रज्ञानाच्याबाबतीत पूर्ण साक्षर नसलेल्या देशात त्याचा पूर्णपणे गैरफायदा घेतला गेला. अर्धवट माहिती असलेल्या तरुणांना गुंतवून ठेवणे आणि त्यातून पैसे कमावण्यापेक्षा त्यांचे खिसे रिकामे करण्याचा हा धंदा राजरोसपणे सुरू झाला. केवळ मोबाईलवरच्या ॲपमधून अतिशय कमी वेळामध्ये हजारो कोटी रुपये कमावले गेले. हा सरळसरळ तंत्रज्ञानाचा वापर करून दिवसाढवळ्या घातला जाणारा दरोडाच होता. त्याची गंभीरता सरकारच्या लक्षात आली असावी. भारतात तरुणांची लोकसंख्या जास्त असल्याने त्यांच्यामध्ये हे ऑनलाईन खेळ जास्त खेळले जाऊ लागले. झटपट पैसे कमावण्याचा हा सोपा मार्ग आहे असे अनेक तरुणांना वाटले. सुरुवातीच्या काळात आपण पैसे जिंकतो आहोत असे आमिष दाखवले जाते. परंतु एखाद्या चक्रव्यूहात अडकवून खेळणाऱ्याला त्यातून बाहेरच पडता येणार नाही अशा प्रकारची युक्ती वापरली गेली.

**दोन लाख कोटींची उलाढाल**

केंद्र सरकारने केलेला हा कायदा सर्व देशभर एकाचवेळी लागू होणार आहे. यातले दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. एक म्हणजे अशा ऑनलाईन गेमची जाहीरातबाजी करणाऱ्या कलाकारांना किंवा क्रिकेटर्सनासुद्धा जबाबदार धरले जाणार आहे. शिवाय कोणाच्याही खात्यातून ऑनलाईन गेम चालवणाऱ्या कंपन्यांच्या खात्यात परस्पर पैसा जाणार नाही, याची खबरदारी आता बँकांनाही घ्यावी लागणार आहे. आपला आवडता कलाकार किंवा क्रिकेटर याची जेव्हा जाहीरात करतो आहे म्हणजे त्यात विश्वास ठेवण्यासारखे काहीतरी असेल असा गेम खेळणाऱ्यांचा समज होतो. परंतु जाहीरात करणारे हे सेलिब्रिटीज तो गेम नेमका आहे तरी कसा याची जराशीही माहिती करून घेत नाहीत. त्याच्या दुष्परिणामांची गोष्ट दूरच राहिली. कारण जाहीरात करणाऱ्या कलाकारांना फक्त कंपन्यांमधून मिळणाऱ्या गडगंज मानधनाशी देणेघेणे असते. परंतु देशातल्या लाखो तरुणांशी खेळ करणारा हा जुगार किती गंभीर आहे हे त्यांच्या ध्यानी येत नाही. बँकांनंतर आपल्या व्यवसायाशी घेणेदेणे असते. या कंपन्यांचे त्या त्या बँकांमधून आर्थिक उलाढाल कोट्यवधीच्या घरात असल्याने या बड्या खातेदाराचे हित त्यांच्यादृष्टीने महत्त्वाचे ठरते. परंतु या दोन्ही प्रकारातून गेम खेळणाऱ्यांच्या भवितव्याचा कोणताही विचार होत नसल्याने त्या दोन्ही घटकांना आता जबाबदार धरले गेले आहे. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात महादेव नावाच्या ॲपने असाच धुमाकूळ घातला होता. केवळ दोन वर्षांत हजार कोटी गोळा करण्याचा विक्रमही या ॲपमधून केला गेला होता. या ॲपच्या एका प्रवर्तकाने दुबईत जाऊन शाही थाटात लग्न केले. या एका लग्नसोहळ्यावर दोनशे कोटी रुपये खर्च केले होते. भारतातल्या अनेक चित्रपट कलाकारांना खास चार्टर्ड विमाने करून दुबईला नेले होते. तो सगळा तामझाम आयकर खात्याच्या लक्षात आल्यानंतर चौकशी सुरू झाली आणि काही जणांना ताब्यातही घेतले गेले होते.

**शुभसंकल्प वाया जात नाही**

आता या मुसक्या आवळल्याबरोबर या ऑनलाईन कंपन्यांमध्ये घबराट पसरली आहे. आता त्यांनी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून कंपन्या कशा बंद पडतील किंवा दोन लाखांपेक्षा अधिक रोजगार बुडेल असे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हा सगळा त्यांचा धंदा वाचवण्यासाठीचा कांगावा ठरतो. ऑल इंडिया ई गेमिंग फेडरेशन, फेडरेशन ऑफ इंडियन फँटसी स्पोर्ट्स यांनी संयुक्तपणे हे पत्र लिहीले आहे. याच पत्रात त्यांनी म्हटले आहे की, भारतात २०२० मध्ये ऑनलाईन गेम खेळणाऱ्यांची संख्या ३६ कोटी होती. २०२४ मध्ये ती पन्नास कोटींहून अधिक झाली. याचा अर्थ हा गेम खेळणाऱ्यांची संख्या किती धोकादायक पद्धतीने वाढत होती हे स्पष्ट होते. एकूण या कंपन्यांमधून होणारी आर्थिक उलाढाल दोन लाख कोटींपेक्षा जास्त आहे. आणि कंपन्यांचा फायदा ३१ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. या फेडरेशनच्या पत्रात ४०० कंपन्या बंद होतील म्हणून त्याच्या पुनर्विचाराची विनंती केली गेली आहे. दोन लाख लोकांच्या रोजगारापेक्षा पन्नास कोटी गेम खेळणाऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. सरकारने अतिशय योग्यवेळी योग्य पाऊल उचलले आहे. आता त्यातून कोणत्याही प्रकारची माघार घेऊ नये. सरकारला त्यातून मिळणारा कर महत्त्वाचा नसून या कंपन्यांनी निर्माण केलेला नशेचा डर अधिक धोकादायक ठरतो. योगायोगाने गेल्या आठवड्यातच स्वामी सवितानंदांच्या आवाहन पत्राच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या या जुगाराच्या धुमाकुळाकडे लक्ष वेधण्याचे काम आम्ही केले आणि या कायद्याबद्दल सवितानंदांनी शुभसंकल्प कधीही वाया जात नसतात अशा प्रकारची प्रतिक्रिया देऊन समाजहित सर्वात महत्त्वाचे आहेत असे म्हटले आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**अर्धवट शिक्षण, अर्धवट ज्ञान, अर्धवट संस्कार माणसाला उद्धट बनवतात.**

## पंचांग

**शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**श्रावण कृष्ण चतुर्दशी**
**नक्षत्र : आश्लेषा**



**रवी उदय- ०६-२३**
**रवी अस्त- १९-००**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**दर्श पिठोरी अमावस्या; मातृदिन; पोळा; वृषभ पूजन; कन्यायन उत्तररात्री २.०४; शरद ऋतू प्रारंभ; अमावास्या प्रारंभ सकाळी ११.५५**


मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)


## पाककृती



### मशरूम सँडविच



★ **साहित्य -** मशरूम - एक कप बारीक चिरलेला, कांदा - एक छोटा बारीक चिरलेला, हिरवी मिरची, एक मिरे पूड - १/४ टीस्पून, मीठ - चवीनुसार, ऑलिव्ह ऑईल/तूप - एक टीस्पून, कॉटेज चीज - एक टेबलस्पून किसलेले, ब्रेड स्लाईस - चार ब्राऊन ब्रेड, कोथिंबीर.

★ **कृती -** सर्वात आधी नॉन-स्टिक पॅनमध्ये ऑलिव्ह ऑईल गरम करा. आता कांदा घाला आणि हलका सोनेरी होईपर्यंत तळा. आता हिरवी मिरची आणि चिरलेले मशरूम घाला. मशरूम मऊ होईपर्यंत ४-५ मिनिटे शिजवा. त्यात मीठ आणि मिरे पूड घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही थोडे चीज देखील घालू शकता. आता गॅस बंद करा आणि मिश्रण थोडे थंड होऊ द्या. आता हे मिश्रण ब्रेड स्लाईसवर पसरवा आणि दुसरा स्लाईस वर ठेवा आणि टोस्टर किंवा पॅनवर बेक करा. ते दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत बेक करा. हिरव्या कोथिंबीर चटणी किंवा टोमॅटो चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा.

# पद्मश्री पुरस्कारासाठी खेळाडूंची नावे पाठवली

## स्वप्नील कुसाळे आणि डी.गुकेशचा समावेश

**क्रीडा मंत्रालयाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पदक जिंकणाऱ्या खेळाडूंची नावे पद्मश्री पुरस्कारासाठी पाठवली. जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा जिंकणाऱ्या डी. गुकेशचाही समावेश आहे. क्रीडा मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, पॅरिस ऑलिम्पिकमधील पदक विजेत्या खेळाडूंव्यतिरिक्त डी. गुकेशचे नाव देखील पाठवण्यात आले आहे.**





■ नवी दिल्ली

**पॅरिस** ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ६ पदके पटकाविली होती. यामध्ये १ रौप्य आणि ५ कांस्यपदकांचा समावेश होता. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी पदके जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये नीरज चोप्रा आणि गोलकिपर पीआर श्रीजेश यांना आधीच पद्मश्री पुरस्कार मिळाला आहे. अशा परिस्थितीत हा पुरस्कार त्यांना पुन्हा देता येणार नाही. नीरज-श्रीजेश व्यतिरिक्त मनु भाकर, सरबजोत सिंग, स्वप्नील कुसाळे आणि अमन सेहरावत यांची नावे पाठवण्यात आली आहेत. २०२२ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी नीरज चोप्रा याला पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. पद्म पुरस्कारांसाठी सर्व नामांकने पद्म पुरस्कार समितीसमोर सादर केली जातात, जी दरवर्षी पंतप्रधानांद्वारे स्थापन केली जाते. पद्म पुरस्कार समितीचे अध्यक्ष कॅबिनेट सचिव असतात आणि त्यात गृह सचिव, राष्ट्रपतींचे सचिव आणि ४ ते ६ इतर सदस्य असतात. समितीच्या शिफारशी पंतप्रधान आणि भारताच्या राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी सादर केल्या जातात. मनू-गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न मिळाले. ८ महिन्यांपूर्वी १७ जानेवारी रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नेमबाज मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ विजेता डी. गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा ॲथलीट खेळाडू प्रवीणकुमार यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित केले.

## बीसीसीआयने मुख्य निवडकर्ता अजित आगरकरचा करार वाढवला

■ मुंबई



**भारतीय** क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांचा करार वाढवला आहे. ते जून २०२६ पर्यंत या पदावर राहतील. आगरकर यांना जुलै २०२३ मध्ये भारतीय संघाच्या निवड समितीचे अध्यक्ष बनवण्यात आले.

आगरकर यांच्या कार्यकाळात भारतीय संघाने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषक आणि यावर्षाच्या सुरुवातीला चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. याशिवाय भारतीय संघ २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीतही पोहोचला. जिथे त्यांना ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. आयपीएल २०२५ पूर्वी कराराचे नूतनीकरण करण्यात आले होते. आगरकर यांचा करार इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या आधी नूतनीकरण करण्यात आला होता. त्यांच्या कार्यकाळात भारतीय संघाने जेतेपद जिंकले आणि (कसोटी आणि टी-२० मध्ये) परिवर्तनही पाहिले.

## अजिंक्य रहाणेचा मुंबईच्या कर्णधारपदाचा राजीनामा

■ मुंबई

**भारतीय** क्रिकेट संघाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेने आगामी देशांतर्गत क्रिकेट हंगामापूर्वी मुंबईच्या कर्णधारपदाचा राजीनामा देण्याचा मोठा निर्णय घेतला. वयाच्या ३७ व्या वर्षी रहाणेने आपले वय आणि नव्या कर्णधाराला तयार करण्याचा विचार करून हा निर्णय घेतला. मात्र, तो मुंबई संघाचा खेळाडू म्हणून खेळत राहणार आहे. रहाणेने ही घोषणा एक्सवर पोस्ट शेअर करत केली.

रहाणेने आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले की, मुंबई संघाचे कर्णधारपद सांभाळणे आणि विजेतेपद मिळवणे हा माझ्यासाठी सन्मानाचा क्षण होता. आगामी देशांतर्गत हंगामाच्या पार्श्वभूमीवर नव्या कर्णधाराला तयार करण्याची ही योग्य वेळ आहे, असे मला वाटते. त्यामुळे मी कर्णधारपदाची जबाबदारी पुढे न सांभाळण्याचा निर्णय घेतला आहे. मी एक खेळाडू म्हणून माझे सर्वोत्तम योगदान देण्यास पूर्णपणे कटिबद्ध आहे आणि मुंबई क्रिकेट असोसिएशनसोबत माझा प्रवास सुरू ठेवून आणखी ट्रॉफी जिंकण्यासाठी प्रयत्नशील राहीन. या हंगामाची मी आतुरतेने वाट पाहत आहे.

## आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा

■ नवी दिल्ली

**चीनच्या** हांग्झोमध्ये होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी ५ ते १४ सप्टेंबर या कालावधीत २० सदस्यीय भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार म्हणून अनुभवी मिडफिल्डर सलीमा टेटे हिला कायम ठेवण्यात आले. ही स्पर्धा खूप महत्त्वाची आहे. कारण त्यातील विजेता संघ २०२६ च्या महिला हॉकी विश्वचषकासाठी पात्र ठरणार आहे.

भारताला गट ब मध्ये स्थान देण्यात आले असून भारतीय संघाचा जपान, थायलंड आणि सिंगापूरशी भिडणार आहे. संघ ५ सप्टेंबर रोजी थायलंडविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल आणि त्यानंतर ६ सप्टेंबर रोजी जपानशी सामना करेल. भारत ८ सप्टेंबर रोजी सिंगापूरविरुद्ध शेवटचा सामना खेळेल. हॉकी इंडियाने जारी केलेल्या प्रेस रिलीजमध्ये मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग म्हणाले की, हांगझोऊ येथे होणाऱ्या महिला आशिया कपसाठी आम्ही निवडलेल्या संघाबद्दल आम्ही उत्साहित आहोत. गेल्या वर्षी कर्णधार म्हणून नियुक्त झाल्यापासून सलीमा संघाचा अविभाज्य भाग आहे.

**भारतीय संघ**

**गोलरक्षकः** बन्सरी सोलंकी, बिचू देवी खरीबम
**बचावपटूः** मनीषा चौहान, उदिता, ज्योती, सुमन देवी थोडम, निक्की प्रधान, इशिका चौधरी
**मिडफिल्डरः** नेहा, वैष्णवी विठ्ठल फाळके, सलीमा टेटे, शर्मिला देवी, लालरेमसियामी, सुनीलिता टोप्पो
**फॉरवर्डः** नवनीत कौर, रुतुजा दादासो पिसाल, ब्यूटी डुंगडुंग, मुमताज खान, दीपिका आणि संगीता कुमारी.

## आशियाई शूटिंग स्पर्धेत अनंतजितला सुवर्णपदक

■ बिनौली

**१६ व्या** आशियाई शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत ऑलिम्पियन अनंतजित सिंग नारुकाने पुरुषांच्या स्कीट स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. कझाकिस्तानच्या श्यामकेंट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत नारुकाने कुवेतच्या माजी आशियाई चॅम्पियन मन्सूर अल रशिदीचा ५७-५६ असा पराभव केला.



श्यामकेंट शूटिंग प्लाझा येथे झालेल्या स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी नारुकाने दोन दिवसांच्या पात्रता फेरीत ११९ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. ६०-शॉट फायनलमध्ये त्याने सुरुवातीपासूनच चांगली कामगिरी केली. सुरुवातीला त्याने ३० पैकी २९ लक्ष्ये मारली आणि नंतर ३६ पैकी ३५ लक्ष्ये मारून पहिल्यांदाच आघाडी घेतली. शेवटच्या १० शॉट्समध्ये कुवेती शूटरशी कठीण स्पर्धा होती. परंतु दोघांनीही प्रत्येकी एक शॉट गमावला असूनही नारुकाने आघाडी कायम ठेवली आणि जिंकला. सौरभ-सुरुचीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. सौरभ चौधरी आणि सुरुची इंदर सिंग या जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. या जोडीने चायनीज तैपेई संघाला १७-९ असे हरवून ही कामगिरी केली. सौरभ आणि सुरुची यांनी पात्रता फेरीत एकूण ५७८ गुण मिळवले आणि पाचवे स्थान मिळवून पदक फेरीसाठी पात्र ठरले. सुरुचीने उत्कृष्ट कामगिरी केली आणि पहिल्या मालिकेत परिपूर्ण १०० गुण मिळवले. दुसऱ्या मालिकेत त्याने ९४ गुण मिळवले असले तरी तिसऱ्या मालिकेत त्याने ९८ गुण मिळवून पुनरागमन केले.

## महिला बॉक्सरसाठी लिंग चाचणी अनिवार्य

■ नवी दिल्ली

**महिला** बॉक्सर्सना लिंग चाचणी करणे आवश्यक झाले आहे. याबाबत जागतिक बॉक्सिंग असोसिएशनने आदेश जारी केले. ४ ते १४ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये त्यांना लिंग चाचणी द्यावी लागणार आहे. जागतिक बॉक्सिंगचे अध्यक्ष बोरिस व्हॅन डेर व्होर्स्ट म्हणाले की, 'आम्ही सर्व व्यक्तींच्या प्रतिष्ठेचा आदर करतो आणि आमचा खेळ शक्य तितका समावेशक असावा, अशी आमची इच्छा आहे. तथापि, बॉक्सिंगसारख्या खेळात खेळाडूंचे संरक्षण करणे आणि स्पर्धेत निष्पक्षता राखणे हे आमचे कर्तव्य आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्येही अल्जेरियन बॉक्सरवर पुरुष असल्याचा आरोप ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या अल्जेरियाच्या इमान खलिफ आणि तैवानच्या लिन यू-टिंग यांच्यावर त्यांच्या लिंगावरून आरोप झाले आहेत.

## यूएस ओपनच्या मिश्र दुहेरीत एरानी-वावसोरी पुन्हा विजेते

■ न्यूयॉर्क

**सारा एरानी** आणि आंद्रिया वावसोरी या इटलीच्या जोडीने आपले प्रभावी फार्म कायम ठेवला आणि त्यांनी काल रात्री अंतिम फेरीत विजय मिळवून यूएस ओपन टेनिस स्पर्धेचे मिश्र दुहेरीचे विजेतेपद कायम ठेवले. त्यांनी इगा स्विएटेक आणि कॅस्पर रुड यांचा ६-३, ५-७ (१०-६) असा पराभव केला आणि १ दशलक्ष डॉलरची बक्षीस रक्कम जिंकली. जी गेल्या वर्षी त्यांना मिळालेल्या बक्षीस रकमेपेक्षा खूपच जास्त आहे.

विजयानंतर वावसोरी म्हणाले की, 'मला वाटते की, इतक्या प्रेक्षकांसमोर या कोर्टवर खेळणे खूप छान होते आणि प्रेक्षकांचे मी मनापासून आभार मानू इच्छितो.' याआधी स्वीटेक आणि रुड या तिसऱ्या मानांकित जोडीने पहिल्या उपांत्य फेरीत टायब्रेकरमध्ये अव्वल मानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रेपर यांचा ३-५, ५-३, १०-८ असा पराभव केला. त्यानंतर दुसऱ्या उपांत्य फेरीत एरानी आणि वावसोरी यांनी डॅनियल कॉलिन्स आणि ख्रिश्चन हॅरिसन यांचा ४-२, ४-२ असा पराभव केला. यूएस ओपनमधील एकेरी सामने २४ ऑगस्टपासून सुरू होतील.



पुढील आठवड्यात श्री गणेशाचे आगमन होत आहे. महाराष्ट्र राज्यात हा मोठा धार्मिक सण मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जातो, परंतु भारतातील अनेक राज्यांमध्ये देखील या सणाचे अनन्य महत्त्व आहे. लोक गणपती बाप्पाच्या आगमनाची जोमाने तयारी करत आहेत. त्यामुळे या आठवड्यात एकही मोठा सिनेमा सिनेमागृहात प्रदर्शित होणार नाही. परंतु ओटीटी प्लॅटफॉर्मवर मात्र या आठवड्यात क्शन चित्रपटांपासून रोमँटिक कथा आणि कौटुंबिक शो, वेब सिरिजपर्यंत प्रेक्षकांना मनोरंजनाची भरपूर मेजवानी मिळणार आहे. तर मग चला पाहूया, कोणत्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर काय बघायला मिळेल ते.



# वीकेण्डला काय बघाल?

## द ट्विस्टेड टेल ऑफ अमांडा नॉक्स



अमांडा नॉक्स नावाच्या एका प्राध्यापकाच्या आयुष्यात एखाद्या चित्रपटाप्रमाणे घटना घडत जातात, जेव्हा तिच्यावर रूममेट मेरेडिथ केर्चरची हत्या केल्याचा आरोप केला जातो. जिओ हॉटस्टारवर ही वेब सिरीज २० ऑगस्टला प्रदर्शित झाली आहे.

## इत्ती सी खुशी




ही मालिका सोनी टीव्ही व सोनी लिववर १८ ऑगस्टपासून सुरू झाली आहे. या मालिकेची कथा मुंबईमध्ये राहणाऱ्या अन्विता नावाच्या एका मुलीची आहे. ती आपल्या सहा भावा -बहिणींमध्ये सर्वात मोठी आहे. वडील मद्यपी आहेत आणि आई घर सोडून निघून गेली आहे. त्यामुळे शिक्षण सोडून अन्विताला घराची जबाबदारी सांभाळावी लागते. या सर्व समस्यांमध्ये ती शोधत आहे.. 'इत्ती सी खुशी'

## अमार बॉस



या बंगाली चित्रपटाची कथा एका प्रकाशकावर आधारित आहे. ऑफीसमध्ये त्याच्या मनावर एक प्रकारचा दबाव निर्माण होतो कारण त्याची आई इंटर्न (प्रशिक्षणार्थी) बनून त्याच्या ऑफीसमध्ये काम करायला लागते. हा हलका फुलका , भावनाप्रधान चित्रपट २२ ऑगस्ट रोजी हिंदी भाषेमध्ये झी ५ वर पहायला मिळेल. या सिनेमाद्वारे ज्येष्ठ अभिनेत्री राखी गुलजार यांनी अभिनयात पुनरागमन केले आहे.

## स्टॉकिंग सामंथा: १३ ईयर्स ऑफ टेरर




सामंथा नावाची एक मुलगी २०११ मध्ये क्रिस्टोफरला भेटते, तेव्हा तिला काही विचित्र गोष्टींचा अनुभव येतो. सामंथाचे आयुष्य भयानक बनते जेव्हा ही व्यक्ती तेरा वर्ष तिचा पाठलाग करत राहतो आणि तिचे अपहरण करून तिला त्रास देतो. सत्य घटनेवर आधारित ही मिनी सीरिज जिओ हॉटस्टारवर १९ ऑगस्टला प्रदर्शित झाली आहे.

## मां




अभिनेत्री काजोल अभिनित मां हा सिनेमा काही दिवसांपूर्वीच सिनेमागृहात प्रदर्शित झाला होता. आता आज हा सिनेमा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे.

## मारीसन



काही मजेशीर बघण्याची इच्छा असल्यास, आज नेटफ्लिक्सवर 'मारीसन' हा मूळ तमिळ चित्रपट हिंदीसह अन्य प्रादेशिक भाषांमध्ये प्रदर्शित होत आहे. सुधीश शंकर दिग्दर्शित या सिनेमामध्ये फहाद फासिल आणि वादिवेलू यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ही एका चोराची कथा आहे. पिळ्ळई नावाच्या एका वृद्ध माणसाला विसरण्याची सवय असते. म्हणून हा चोर त्याच्याशी मैत्री करतो. त्याला पिळ्ळईची संपत्ती हडप करायची आहे. परंतु पुढे अशा काही गोष्टी घडतात ज्यातून चोराला प्रश्न पडतो की, हा वृद्ध नक्की आहे तरी कोण?

## शोधा




सस्पेंस थ्रिलर शोधा ही मूळ कन्नड भाषेत बनलेली सीरिज हिंदीसह अनेक प्रादेशिक भाषांमध्ये तयार केली आहे. या सीरिजमध्ये प्रेक्षकांना एक वेगळी कथा पाहायला मिळेल. रोहित नावाच्या एका माणसाची पत्नी अचानक गायब होते आणि अचानक परतही येते. परंतु आता रोहितला संशय आहे की, परतलेली स्त्री त्याची पत्नी आहे की नाही? तो स्वत:च या गोष्टीचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा अनेक रहस्य समोर येतात. ही सीरिज आज झी ५ वर प्रदर्शित होत आहे.

## थलाइवन थलाइवी



तुम्हाला आपल्या कुटुंबासह बघण्यासाठी एखादा हलकाफुलका मजेशीर चित्रपट बघायचा असल्यास, आज विजय सेतुपती आणि नित्या मेनन अभिनित 'थलाइवन थलाइवी' हा चित्रपट ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होत आहे. हिंदीमध्ये हा सिनेमा पाहता येईल.

## पीसमेकर २



जिओ हॉटस्टारवर आज 'पीसमेकर सीझन २' प्रदर्शित होत आहे. ही एक कॉमिक सीरिज असून या सीरिजचा पहिला सीझन खूप लोकप्रिय झाला होता. यामध्ये जॉन सीना, डॅनिएल ब्रुक्स, फ्रेडी स्ट्रोमा, जेनिफर हॉलंड, आणि फ्रँक ग्रिलो हे कलाकार आहेत.

## बिग बॉस १९



लोकप्रिय रिॲलिटी टीव्ही शो बिग बॉस चा १९वा सीझन कलर्स चॅनलसह ओटीटी प्लॅटफॉर्म जिओ हॉटस्टारवर २४ ऑगस्टपासून सुरु होत आहे. सलमान खान या शोचा सूत्रसंचालक आहे.

## मिशन इम्पॉसिबल: द फायनल रेकनिंग



टॉम क्रूझचा ॲक्शन-ॲडव्हेंचर चित्रपट 'मिशन: इम्पॉसिबल - द फायनल रेकनिंग', म्हणजेच 'मिशन इम्पॉसिबल ८', हा प्रचंड लोकप्रिय झालेला सिनेमा १९ ऑगस्टला प्राइम व्हिडिओ व ॲप्पल टीव्हीवर प्रदर्शित झाला आहे.

# आर्यनच्या सीरिजचा प्रीव्हू

**किंग** शाहरुख खानचा मुलगा आर्यनने दिग्दर्शित केलेली पहिली डॉक्युमेंट्री 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' ( Ba***ds Of Bollywood) चा प्रीव्हू नुकताच प्रदर्शित केला गेला. या समारंभात आर्यनने पहिल्यांदाच सर्वांच्या समोर भाषण

केले. त्याने सांगितले की मी खूप नर्व्हस झालो होतो आणि तीन रात्र मी या भाषणाची तयारी करत होतो. मी इतका घाबरला होतो की, मी आपले भाषण टेलीप्रॉम्प्टरवर चालवले होते आणि भाषणाच्या वेळी समजा वीज गेली तर भाषणाचा एक कागद सुध्दा बरोबर आणला आहे. त्यानंतरही समजा काही



चूक झालीच तर माझे वडील शाहरुख खान मला वाचवायला आहेतच. आर्यनच्या या भाषणानंतर किंग खानने आपल्या पाठीवर भाषणाची एक कॉपी टेपने चिकटवली असल्याचे दिसले. त्यानंतर आर्यनने अगदी प्रामाणिकपणे सांगितले की, या सर्व गोष्टींनंतर सुध्दा माझ्याकडून काही चूक झाली तर मला क्षमा करा. मी पहिल्यांदाच भाषण करत आहे. आपल्या भाषणाच्या शेवटी आर्यनने सर्व उपस्थितांचे आभार मानले व सांगितले की, आम्ही अनेक ठिकाणी अनेक लोकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला. चार वर्षांच्या अथक परिश्रमानंतर असंख्य चर्चा आणि हजारो टेकनंतर हा शो तयार झाला आहे. मी त्या सर्व लोकांचा आभारी आहे ,ज्यांच्याशिवाय हा शो बनवणे अशक्य होते. आर्यनच्या भाषणानंतर त्याचा हा व्हिडिओ व्हायरल झाला, शाहरुखच्या चाहत्यांनी त्यावर आपले मत लिहायला सुरुवात केली. अनेक चाहत्यांचे मत आहे की, आर्यन खान व शाहरुखच्या बोलण्याच्या पध्दतीत खूप साम्य आहे. एका युजरने व्हिडिओखाली लिहिले आहे की, 'अगदी शाहरुख खानसारखा दिसतो आहेस. अन्य एकाने लिहिले आहे की, 'शाहरुखचा आवाज = आर्यनचा आवाज'. रेड चिलीज एंटरटेनमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड द्वारे निर्माण करण्यात आलेल्या या डॉक्युमेंट्रीचा निर्माता आर्यन खान आहे. तर बिलाल सिद्दीकी आणि मानव चौहान हे सहनिर्माता आहेत. १८ सप्टेंबर रोजी ही सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. आर्यन खानच्या 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड'च्या २ मिनिटे २७ सेकंदाच्या व्हिडिओमध्ये प्रेक्षकांना अपेक्षित असलेला सर्व मसाला आहे. बॉलीवूडमधील सत्यता कुणी अन्य नव्हे तर बॉलीवूडचा भाईजान सलमान खानच प्रेक्षकांना सांगणार आहे. या सीरिजमध्ये सलमानचा कॅमिओ असून त्याच्यासह शाहरुख खान, रणवीर सिंग, करण जौहर, बॉबी देओल यांचा देखील कॅमिओ बघायला मिळणार आहे.

# प्रियांका- विशालच्या 'कमीने' आठवणी



**सेटवर** अनेकदा दिग्दर्शक व कलाकारांमध्ये लहान मोठी नाराजी होत असते. छोटे वाद होत असतात. ही नाराजी व वाद तात्पुरते असतात आणि नंतर त्यांची आठवण या कलाकार-दिग्दर्शकांच्या ओठांवर हसू फुलवत असते. असेच काहीसे देसी गर्ल अभिनेत्री प्रियंका चोप्रा आणि दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांच्यामध्ये घडले होते. प्रियांका चोप्रा, शाहिद कपूर अभिनित व विशाल भारद्वाज दिग्दर्शित कमीने या सिनेमाच्या प्रदर्शनाला नुकतीच १६ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने प्रियंका चोप्राने आपल्या इंस्टाग्राम आकाऊंटवर या सिनेमाशी निगडीत एक फोटो शेअर केला, तेव्हा दिग्दर्शक विशाल भारद्वाजने 'कमीने'शी निगडीत एक रंजक कथा पोस्ट केली आहे. त्यांनी लिहिले आहे की, प्रियंका, मला विचार, कमीनेचे ते दिवस मी किती आठवत असतो ते. माझ्या कारकिर्दीतील हा सर्वात चांगला जोडीदार आहे. या आठवणी. मला आठवतं आहे की, एक दिवस तू माझ्यावर खूप रागावली होतीस, तेव्हा मी माझ्या हातांनी एका नॅपकिनवर एक कविता लिहिली होती व तुझी समजूत काढण्यासाठी ती कविता तुला पाठवली होती. विशालने त्या कवितेतील काही ओळी देखील पोस्टमध्ये शेअर केल्या आहेत. 'दूसरी जंग-ए-आदम को खत्म हुए भी बीते साल, अब भी कुछ जापानी अफसर छिपे मिले हैं ड्यूटी पर। तुम से कब मिलना होगा..., अजूनही तू माझ्यावर नाराज आहेस का? विशाल भारद्वाज यांची ही पोस्ट वाचल्यानंतर प्रियांकाने देखील लिहिले आहे की, तुमच्या कोण नाराज होऊ शकेल विशाल भारद्वाज? तुम्ही या भेटायला. २००९ मध्ये कमीने हा सिनेमा ऑगस्ट महिन्यात प्रदर्शित झाला होता.




# शम्मी कपूरनी सांगितल्याप्रमाणे मोहम्मद रफी यांनी गाणे गायले तेव्हा...

**चित्रपटसृष्टीला** नेहमी नावे ठेवली जातात की, या क्षेत्रात फक्त पैशांना महत्त्व दिलं जातं, नातेसंबंधांना नाही. परंतु ही गोष्ट तितकीशी खरी नाही. चांगली वाईट माणसे सर्वच क्षेत्रात असतात. ज्याप्रमाणे गायक मुकेश शो मॅन राज कपूरचा आवाज बनले होते, किशोर कुमार राजेश खन्ना यांचा आवाज बनले होते आणि उदित नारायण परफेक्शनिस्ट आमिर खानचा आवाज बनले होते, त्याचप्रमाणे शम्मी कपूरचा आवाज बनले होते थोर





गायक मोहम्मद रफी. या गायक- कलाकाराच्या जोड्या फक्त रुपेरी पडद्यापर्यंत सीमित नव्हत्या तर प्रत्यक्ष जीवनात देखील त्यांच्यामध्ये अतूट मैत्री होती. शम्मी कपूर यांची अनेक गाणी रफींनी गायली आहेत. वास्तविक जीवनात देखील दोघांची छान मैत्री होती. आणि आपली गाणी मोहम्मद रफी यांच्याकडूनच गाऊन घ्यावीत असा शम्मी यांचा आग्रह असे.

हा किस्सा आहे शक्ती सामंता दिग्दर्शित 'काश्मीर की कली' या सिनेमाच्या गाण्याचा. चित्रपटाचे संगीतकार होते ओ.पी. नय्यर. चित्रपटामध्ये एक सिचुएशन होती की, नायिकेचे सुंदर रुप बघून नायक तिच्या प्रेमात पडतो आणि तिच्या सौंदर्याची स्तुती करतो. या रोमँटिक गाण्याची चाल ओ.पी. नय्यर यांनी तयार केली होती आणि त्या काळातील पद्धतीप्रमाणे गाणे रेकॉर्ड करण्यापूर्वी रफीकडून त्या गाण्याची रिहर्सलसुद्धा केली होती.

परंतु ज्या दिवशी या गाण्याचे रेकॉर्डिंग होते, त्यादिवशी स्टुडिओमध्ये चित्रपटाचे नायक शम्मी कपूर हजर झाले. ओ.पी.नय्यरसह रफीना रिहर्सल करताना बघून शम्मी कपूर यांच्या डोक्यात काय आलं, कोण जाणे. त्यांनी रफींना सांगितलं की, रफी जी, असं करा की, प्रत्येक अंतऱ्यातील शेवटची ओळ वेगळ्या पद्धतीने गा, म्हणजे मी देखील त्यावर वेगवेगळा अभिनय करेन.

रफींनी शम्मी कपूर यांच्या या बोलण्यावर संमती दर्शवली, परंतु संगीतकार ओ.पी. नय्यरला ही गोष्ट रुचली नाही. आपला विरोध दर्शवत त्यांनी लगेच मोहम्मद रफींना सुनावले की, 'नाही, नाही रफी साहब, तुम्हाला ज्या पद्धतीने मी गाण्याची चाल सांगितली आहे, त्याच पद्धतीने गाणं गा, शम्मीचं ऐकू नका.'





'पापा जी, पडद्यावर तर शम्मी ॲक्टिंग करणार आहे, मग एकदा त्यांचं बोलणं ऐकायला काय हरकत आहे? त्यांचा आग्रह मानून बघू या. जर चांगलं वाटलं नाही, तर मग तुम्ही जसे सांगितले आहे, तसेच गाईन. मग तर झालं?' रफींनी आपल्या मुलायम आवाजात ओ. पी. नय्यरना सांगितले.

आपल्या गाण्याची चाल कुणी बदलण्याचा प्रयत्न केला तर ते ओ. पी. नय्यर ना आवडत नसे. अनेकदा ते निर्माता-दिग्दर्शकांशी हुज्जत घालून गाण्याची चाल बदलण्यास नकार देत असत. परंतु रफींच्या कोमल स्वरातील बोलण्यावर ते नकार देऊ शकले नाहीत.'ठीक आहे, पण मला चांगले वाटले नाही, तर माझ्याच पध्दतीने गा रफी जी'.

गाण्याचे रेकॉर्डिंग सुरू झाले. शम्मी कपूरना ज्या प्रमाणे प्रत्येक अंतर्याच्या शेवटच्या ओळीमध्ये विविधता हवी होती, त्याच पध्दतीने रफी गायले. रेकॉर्डिंग संपल्यावर रफी, ओ.पी. नय्यर आणि शम्मी कपूर यांनी रेकॉर्ड झालेले गाणे ऐकले तेव्हा ओ.पी. नय्यर पटकन आपल्या खुर्चीतून उठले आणि त्यांनी शम्मी कपूरना मिठी मारली. त्यावेळी मोहम्मद रफी यांनी काही न बोलता फक्त खेळकर हसत ओ.पी. नय्यरकडे बघितले. त्यांच्या त्या हास्यातून ते ओ. पी. नय्यरना सांगू इच्छित होते की, बघितले ना, गाणे कसे छान झाले आहे, तुम्ही उगाचच अडून बसला होतात.

आत्तापर्यंत वाचकांच्या लक्षात आले असेल की, हा किस्सा कोणत्या गाण्याबद्दलचा आहे. एस.एच.बिहारी लिखित या आयकॉनिक गाण्याचे बोल आहेत.

***ये चांद सा रोशन चेहरा, ज़ुल्फ़ों का रंग सुनहरा***
***ये झील सी नीली आँखें, कोई राज़ है इनमें गहरा***
***तारीफ़ करूँ क्या उसकी, जिसने तुम्हें बनाया,***

हे गाणे चित्रित करताना प्रत्येक अंतऱ्याच्या शेवटी 'तारीफ करूं क्या उसकी' या ओळीवर शम्मी कपूर यांनी वेगवेगळ्या नृत्य अदा केल्या आहेत. हे गाणे यूट्यूबवर जरूर बघा.

